

बहुजन हिताय, बहुजन सुखाय ॥ हमारी ताकत, हमारी एकता ॥ आपली संघटना, आपली सुरक्षितता ॥



ALL INDIA FOREST OFFICER FEDERATION, NEW DELHI

# बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य

कार्यालय पत्ता : गुरुकृपा निवास, मेन रोड पुंडलिकबाबा नगर, कठोरा नाका, टॉवर लाईन, अमरावती-४४४ ६०४

Email Id : bvaksms@gmail.com Web site : htpp:www//bahujanayvanvibhagunion.org

✲ प्रदेशाध्यक्ष ✲
Senior Vice-President (AIFOF, Delhi)
राजेन्द्र गांजरे
मो.नं. ७७९८० ५५२४५

✲ संयोजक ✲
देवकिशोर गडपांडे
मो.नं. ९२८४७ ३४०४५

✲ प्रदेश कोषाध्यक्ष तथा
राष्ट्रीय लेखापरिक्षक (AIFOF, Delhi) ✲
जगदिश बलोदे
मो.नं. ९८२३८ ९१६७२

✲ प्रदेश महासचिव ✲
राजेश खडसे
मो.नं. ९४२१७ ४१३२५

✲ प्रदेश कार्याध्यक्ष ✲
जगदिश बलोदे (अतिरिक्त कार्यभार)

✲ प्रदेश मुख्य प्रवक्ता ✲
रमेश सोनुले
निखिल गोरे

✲ प्रदेश उपाध्यक्ष ✲
प्रदिप बावने
सुरेन्द्र डाहाके
कु.संध्याताई उमप (अतिरिक्त कार्यभार)

✲ प्रदेश उप-महासचिव ✲
रविन्द्र विधळे
विजय कामथे

✲ प्रदेश सह-कोषाध्यक्ष ✲
कु.संध्याताई उमप

✲ प्रदेश महिला मुख्य संघटक ✲
कु. प्रीती तिवारी
कु. भारती पंधराम
कु. स्वाती जाधव

✲ प्रदेश मुख्य संघटक ✲
प्रविण नारनवरे
बाबुराव येवले
किरण श्रीखंडे
राजेन्द्र इंदुरकर

✲ प्रदेश माहिती व
प्रसिध्दी अधिकारी ✲
ईकबाल शेख

✲ प्रदेश कायदा व
विधी सल्लागार प्रमुख ✲
प्रभाकर वानखडे
अशोकराव थेटे
अरुण जाधव


## अति तात्काळ निवेदन.

क्रमांक -: म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/ 192 / 2025-26
महाराष्ट्र, दिनांक 07 / 02 / 2026

प्रति,

(01) मा.ना.श्री.नरेन्द्रजी मोदी, पंतप्रधान, भारत सरकार, नवि दिल्ली.

(02) मा.श्रीमती द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती, नवि दिल्ली.

(03) मा.देवव्रत आचार्य, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.

(04) मा.ना.श्री. देवेन्द्रजी फडणविस,
मुख्यमंत्री तथा अति.कार्यभार वित्तमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(05) मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(06) मा.ना.श्रीमती सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(07) मा.ना.श्री. गणेशजी नाईक, वनमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(08) मा.श्री. प्रविणजी तायडे, आमदार.

(09) मा.श्री. उमेशजी यावलकर, आमदार.

**विषय -:** **सन 2014 पासून मा.ना.श्री.नरेन्द्र मोदी पंतप्रधान यांचे प्रत्येक नागरीकास पक्के घर ही संकल्पना राबवित असतांना वनविभागातील लाखो अधिकारी व कर्मचारी हे सन 2018 पासून घरबांधणी अग्रिमे अनुदानापासून वंचित झाल्यामुळे शिर्ष 2406-7610 मध्ये रक्कम रुपये 800 कोटी अनुदान देऊन होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत.**

**वाचा -:**

01. बहुजनाय वनविभाग संघटना दि. 02 जानेवारी 2017 नंतर दि. 19/02/24 रोजी स्थापन झाल्याप्रमाणे दि. 11/06/24 रोजी Trade Union Act, 1926 अंतर्गत NGP-5904 प्रमाणे नोंदणीकृत झाली आहे.
02. बहुजनाय वनविभाग संघटना ही मागासवर्गीय संघटना असल्यामुळे साप्रवि/शासन परिपत्रक दिनांक 03/03/2018 व 27/04/2018 अन्वये कामे करीत आहे.
03. मा.अप्रमुवसं (प्र.दु.सं.) म.रा.नागपूर यांचेकडील दिनांक 25/04/2025 चे अन्यायकारक पत्राविरुध्द दिनांक 28/04/2025 अन्वये लिगल नोटीस बजाविण्यात आली असून प्रकरण मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.
04. निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.16/179, दि. 23/11/25 अन्वये शासन मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**संदर्भ -:**

| | |
|---|---|
| **01** | **महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्रमांक घबांअ-2023/प्र.क्र.39/2023/विनियम, दिनांक 01 मार्च 2024** |
| **02** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/324, दिनांक 01/01/2025** |
| **03** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/393, दिनांक 22/02/2025** |
| **04** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/429, दिनांक 15/03/2025** |
| **05** | **मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, अर्थसंकल्प, नियोजन व विकास, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-2(1)/असं/प्र.क्र.10/526, दिनांक 28/01/2025. (संघटनेला ईमेल प्राप्त दिनांक 18/03/2025.)** |
| **06** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/442, दिनांक 19/03/2025** |
| **07** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/09, दिनांक 06/04/2025** |
| **08** | **संघटनेचे निवेदन क्रमांक म.रा.संघटना/बहुजनाय/प्र.क्र.42/183, दिनांक 22/12/2025** |

**मा.महोदय / महोदया,**

उक्त संदर्भिय 01 चे घरबांधणी अग्रिम संबंधी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाकडे लक्ष वेधु ईच्छितो. तसेच विषयांकीत प्रकरणी संघटनेने आजपावेतो दिलेल्या संदर्भ-02 ते 04 व 06 ते 08 च्या निवेदनांकडे लक्ष वेधू ईच्छितो आणि महत्वाचे म्हणजे, मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, अर्थसंकल्प, नियोजन व विकास, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी घरबांधणी अग्रिमे करीता अनुदान उपलब्ध करवुन देण्यासंबंधी केलेल्या संदर्भ-05 चे पत्राकडे लक्ष वेधू ईच्छितो.

**तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक 07/02/2026 रोजी Send your Creative Ideas and suggestions to Chief Minister of Maharashtra अन्वये ऑनलाईन केलेल्या विनंती निवेदनाकडे लक्ष वेधू ईच्छितो.**

## देशातील प्रत्येक नागरीकास पक्के घर संकल्पना :

**सन 2014 पासून मा.ना.श्री.नरेन्द्र मोदी पंतप्रधान यांनी भारत देशातील प्रत्येक नागरीकास पक्के घर देण्याची संकल्पना राबविणे सुरु आहे. परंतू महाराष्ट्र वनविभागातील लाखो अधिकारी व कर्मचारी हे सन 2018 पासून घरबांधणी अग्रिमे अनुदानापासून वंचित झालेले असल्यामुळे आपले लक्ष वेधू ईच्छितो.**

## अन्याय क्रमांक – 01

घरबांधणी अग्रिमे अनुदान हे माहे मार्च महिन्याचे 20 तारखेस किंवा त्यानंतर बिम्स प्रणालीवर उपलब्ध होते. तथापि काही वन अधिकारी व कर्मचारी यांची बदलीने इतर विभागात पदस्थापना झाल्याने त्या-त्या विभागात सेवेत रुजू होतात. त्यामुळे त्यांना त्यांचे अनुदान त्या-त्या विभागाचे बिम्स प्रणालीवर वाटप करतांना, कोषागारात दाखल करतांना, वेळेअभावी आस्थापना कर्मचाऱ्यांना गंभिर व मोठया प्रमाणात तारेवरती कसरत करावी लागते. परिणामी अनुदाना अभावी बदलून गेलेल्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना वंचित राहावे लागते. मग वन अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरडा-ओरड सुरु होते. तरी कृपया माहे मार्च ऐवजी एप्रिल ते जानेवारी महिन्यातील कोणत्याही महिन्यामध्ये घरबांधणी अग्रिम वाटप करण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी नम्रपणे विनंती करण्यात येत आहे.

## अन्याय क्रमांक - 02

उक्त संदर्भिय 01 चे शासन निर्णयातील तरतुदीन्वये महाराष्ट्रातील वनविभागातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घराचे बांधकाम करण्यासाठी किंवा घर विकत घेण्यासाठी अर्ज केल्याप्रमाणे जेष्ठतेनुसार घरबांधणी अग्रिम अदा करण्यात येते. परंतु शासनाकडून सन 2017-18 पासून अनुदान उपलब्ध झाले नसल्यामुळे वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गंभिरपणे आघात झालेला आहे.

## अन्याय क्रमांक - 03

सन 2017 पासून घरबांधणी अग्रिम अनुदान उपलब्ध करवुन देण्यासाठी **मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, अर्थसंकल्प, नियोजन व विकास, महाराष्ट्र राज्य, नागपूर** यांचेकडून वारंवार पत्रव्यवहार सुरु असल्याचे संघटनेला अवगत करुन देण्यात आले आहे. तसेच संघटनेकडून सुध्दा **मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक अर्थसंकल्प, नियोजन व विकास, महाराष्ट्र राज्य, नागपूर** यांना उक्त संदर्भ-02 ते 04 अन्वये, **मा.मुख्यमंत्री, मा.वित्तमंत्री, मा.वनमंत्री, मा.उपमुख्यमंत्री** यांना संदर्भ-06 व 08 अन्वये घरबांधणी अग्रिमाचे शिर्ष 2406-7610 मध्ये रक्कम रुपये 800 कोटी वाटप करण्यासाठी दिनांक 31 जानेवारी 2026 पावेतो अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत नम्रपणे विनंती करण्यात आली होती, परंतू शासनाने अजुनपावेतोही कोणत्याही प्रकारचे अनुदान उपलब्ध करुन दिलेले नाही.

**01.** त्यामूळे महाराष्ट्रातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन 2017-18 पासून घरबांधणी अग्रिमाचे वाटप झाले नसल्यामुळे आणि त्यांचे करीता पक्के घर विकत घेणे किंवा प्लॉट घेऊन नविन घराचे बांधकाम करणे थांबले असल्यामुळे वनविभागातील वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वनसर्व्हेक्षक, वनक्षेत्रसर्व्हेक्षक, सांख्यिकी, स्विय सहाय्यक, लघूलेखलक, लेखापाल, लिपीक, मुख्य लेखापाल, शिपाई, नाईक, वनमजुर, इत्यादी अधिकारी व कर्मचारी हे सन 2018 पासून घरबांधणी अग्रिमापासून वंचित असल्याने आरडाओरड सुरु आहे व असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे.

**02.** शासनाकडे वनप्रशासनाकडून व संघटनेकडून वारंवार पत्रव्यवहार करुनही सुध्दा अजूनपावेतो शिर्ष 2406-7610 मध्ये रक्कम रुपये 800 कोटी चे अनुदान दिले जात नाही. यामुळे वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हा फार मोठा गंभिर अन्याय झाला आहे. यामुळे वनविभागातील अधिकारी व कर्मचारी हवालदिल / कर्जबाजारी झालेले आहेत.

**03.** महाराष्ट्र राज्यातील काही वनवृत्तातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना घरबांधणीचा पहिला हप्ता मिळाला. तदनंतर त्यांना दुसरा व तिसरा हप्ता अजूनपावेतोही मिळाला नसल्यामुळे घरबांधणी कामांमध्ये अडथळा निर्माण झाला. त्यामुळे त्यांना उधारीने पैसे आणून कर्जबाजारी व्हावे लागल्याने त्यांची बिकट व दयनिय अवस्था झाली आहे.

कृपया महोदया / महोदय, आपणास पुन:श्च विनंती करण्यात येत आहे की, सन 2014 पासून मा.ना.श्री.नरेन्द्र मोदी पंतप्रधान यांनी प्रत्येक नागरीकास पक्के घर ही संकल्पना राबवित असतांना वनविभागातील लाखो अधिकारी व कर्मचारी हे सन 2018 पासून घरबांधणी अग्रिमे अनुदानापासून वंचित झाल्यामुळे शिर्ष 2406-7610 मध्ये रक्कम रुपये 800 कोटी अनुदान देऊन होत असलेला **अन्याय** दिनांक 28 फेब्रुवारी 2026 पावेतो दूर करण्यासाठी, तसेच घरबांधणी अग्रिमाचे वाटप माहे मार्च मध्ये करण्याऐवजी एप्रिल ते जानेवारी यापैकी कोणत्याही महिन्यात वाटप करण्याचे सुधारित परिपत्रक दिनांक 28 फेब्रुवारी 2026 पावेतो निर्गमित करण्यासाठी, संघटनेकडून नम्रपणे विनंती करण्यात येत आहे. आपणाकडून विहीत मुदतीत न्याय मिळेल अशी संघटनेची धारणा आहे. तथापि आपणाकडून विहीत मुदतीत न्याय न मिळाल्यास सदरील प्रकरण मा.लोक आयुक्त यांचे कडे न्यायप्रविष्ट करण्यात येईल, याबाबत आपणास अवगत करुन देण्यात येत आहे. याद्दष्टीने सहकार्य कराल अशी संघटनेची अपेक्षा आहे. आपणाकडुन न्याय मिळेल अशी संघटनेची धारणा आहे.

**यास्तव माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.**

**सकारात्मक अपेक्षासह ...!**

**( राजेन्द्र वि.गांजरे )**
**प्रदेशाध्यक्ष,**
**बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य**
**(र.नं. 5904/24)**
**तथा**
**राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष**
**अखिल भारतीय वन अधिकारी महासंघ, नवि दिल्ली**

**प्रतिलिपी -: माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.**
**By Email / WhatsApp.**

**01.** **मा. प्रधान सचिव (वने) महसुल व वनविभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.**

**02.** **मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.**

**03.** **मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर**